ब्याच दिवसानी एक चांगली सुट्टी घालवण्याची संधी आपण आपल्या 'माडांच्या बनात' मध्ये दिलीत

शब्दशः माडांच्या बनात साकारलेल्या या छोटेखानी रिझॉर्टचे कौतुक करण्यासाठी शब्दभांडार कमी पडावे. श्री. संजय परकर (कि परकार?) व सौ. सायली यानी तेथे स्वर्ग उभा केला आहे.

देखण्या व आटोपशीर खोल्या, ज्यांची सजावट सिव्हील इंजिनीयर असणाऱ्या श्री. संजय यानी स्वतः केली आहे, आणि त्यांची राखलेली स्वच्छता! रिझॉर्टला 2 वर्षे झाली आहेत या वर विश्वास बसू नये इतकी स्वच्छता - खोलीत, बाथरूम मध्ये किंवा संपूर्ण रिझॉर्टच्या परिसरात. सगळे नव्या सारखे चकचकीत. बाथरूमच्या टाईल्सची रंगसंगती छान. रुम मध्ये लिनन टॉवेल्स नव्या सारखे पांढरे शुभ्र स्वच्छ. एक छोटे झिप लॉकचे पाऊच ज्या मध्ये पेस्ट, फेस पावडर, साबण आणि शॉवर कॅप वगैरे.

चहा व नाष्टा रूमच्या भाड्यात समाविष्ट होता. पहिला दुपारचा चहा मसाला घातलेला व गोड होता. आम्हाला कसा आवडेल हे एकदा सांगितल्या नंतर आम्हाला हवा तसा, हवा तेवढा, हवा तेव्हा, मस्त चहा मिळाला. दोनदा नाष्टा घेतला तो उत्कृष्ठ होता. श्री. दिलीप रामाणी उत्तम कुक आहेतच पण सौ. सायली वहिनी स्वतः किचन मध्ये काम करत असल्यामुळे पदार्थांना घरगुती चव होती.

पर्यटक हे आपल्या घरीच आलेले पाहूणे असल्याप्रमाणे त्यांची बडदास्त ठेवण्यासाठी वहिनींची लगबग चालू होती. मत्स्यप्रेमींना पापलेट, बांगडा सुरमई, प्रॉन्स यांचे निरनिराळे चविष्ट पदार्थ आमच्या मागणीवरून केली ती फणसाची भाजी, कुळथाचं पिठलं !!! व्वा.. सोलकढी तर आम्ही सगळेच मनमुराद प्यायलो. शहाळ्याचे पाणि प्यायचे तर आमच्या समोरच माणूस झाडावर चढून ताजे शहाळे काढून द्यायचा. रविवारी तेथून पाय निघत नव्हता पण......

श्री. संजय सौ. सायली श्री. चव्हाण श्री. दिलीप श्री मनीष श्री शेखर आणि त्यांचे साथीदार आपणा सर्वांचे मनःपुर्वक आभार.
पुन्हा नक्की येवू.
दिलीप घाटे. सौ. निलीमा घाटे आणि आमचा समस्त ग्रुप.
आम्ही डॉ. भद्रे या बुकींगवर 1 ते 3 मार्च 2013 ला होतो.